# प्रेस नोट दि. ११/०९/२०२१

## सांगवी येथिल मोबाईल शॉपी फोडल्याचे प्रकरण

## गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी चिंचवड कडुन गुन्हा उघड, ०२ आरोपींना अटक, एकुण ०४,९६,२००/- रु किं चा मुद्देमाल जप्त

सदर प्रकरणाची हकिगत अशी की, दि. ०३/०९/२०२१ रोजी न्यु. डी. पी. रोड विशाल नगर, पिंपळे निलख येथे काही अज्ञात चोरटयांनी आयकॉन मोबाईल शॉपी फोडुन सदर ठिकाणा वरुन वेगवेगळया कंपनीचे ३१ महागडे मोबाईल फोन व इतर मोबाईल फोन ॲक्सेसरिज चोरी केल्या प्रकरणी **सांगवी पोलीस ठाणे, गु.र.नंबर-३५९/२०२१ भा.दं.वि.कलम- ४५४,४५७,३८०** प्रमाणे दाखल होता. सदर **मा. पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड, श्री. कृष्ण प्रकाश सो,** यांनी सदर बाबत गुन्हे शाखेने लक्ष घालुन आरोपी अटक करुन गुन्हे उघडकीस आणणे बाबत आदेशित केले होते.

त्यानुसार आमचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) डॉ. प्रशांत अमृतकर, गुन्हे शाखा युनिट-४ पिंपरी चिंचवड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, प्रसाद गोकुळे, सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, सहायक पोलीस निरीक्षक सिद्धनाथ बाबर तसेच गुन्हे शाखा युनिट-४ कडील स्टाफ सदर घडलेल्या गुन्हया बाबत तपास करत होते. तेव्हा **पोशि/प्रशांत सैद** यांनी केलेल्या तांत्रिक विश्लेषणातुन व **सहायक पोलीस उपनिरीक्षक जाधव, पोहवा/ शेटे, पोना/नदाफ, पोना/ मुंढे पोना/जायभाये** या पथकाने मिळालेल्या बातमी वरुन दि. ०८/०९/२०२१ रोजी कोकणे चौक परिसरातुन आरोपी नामे १) **कमलेश चंद्रकांत रणपिसे,वय-२३ वर्षे, रा- लाईटचे डी.पी. जवळ,भिमनगर, कामशेत ता-मुळशी, जि-पुणे २) तुषार नितिन डुकरे, वय-२० वर्षे, रा- मस्जिदचे बाजुला, मिलिंदनगर, पिंपरी, पुणे** यांना ताब्यात घेवुन त्यांचे कडे कसोशीने तपास करुन त्यांनी सदरचा गुन्हा केल्याचे निष्पन्न केले. त्यांचे कडुन सदर गुन्हयात चोरीस गेलेले वेगवेगळया कंपनीचे महागडे मोबाईल फोन, इतर ॲक्सेसरिज किंमती ०३,४६,२००/- रुपये व गुन्हा करताना वापरलेली ०१,५०,०००/- रु. किं ची ऑटो रिक्षा असा एकुण ०४,९६,२००/- रु. किं. चा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदर आरोपींना पुढील तपासकामी सांगवी पोलीस ठाणे यांचे ताब्यात देण्यात आले असुन पुढील तपास सांगवी पोलीस ठाणे करत आहे.

-----------------------------------------------ooo-----------------------------------------------

**सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. कृष्ण प्रकाश सो, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. डॉ. संजय शिंदे सो, पोलीस उप-आयुक्त, मुख्यालय/गुन्हे मा. सुधीर हिरेमठ सो, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे मा. श्री. डॉ. प्रशांत अमृतकर सो यांचे मार्गदर्शनाखालील गुन्हे शाखा, युनिट-४, वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रसाद गोकुळे, सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, सहायक पोलीस निरीक्षक, सिद्धनाथ बाबर, सहा.पो.उप.नि. धर्मराज आवटे, दादा पवार, नारायण जाधव, पोहवा/ प्रविण दळे, संजय गवारे, अदिनाथ मिसाळ, राहिदास आडे, तुषार शेटे, पोना/मो. गौस नदाफ, वासुदेव मुंडे, सुनिल गुट्टे, सुरेश जायभाये, पोशि/ प्रशांत सैद, तुषार काळे, धनाजी शिंदे, गोंविद चव्हाण, आदिनाथ ओंबासे सुखदेव गावंडे, तांत्रिक विश्लेषन विभाग गुन्हे शाखा चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय तुंगार, स.पो.नि. सागर पानमंद, राजेंद्र शेटे, नागेश माळी, विकास आवटे, पोपट हुलगे यांनी केली आहे.**

Shiremath -

**(सुधीर हिरेमठ) भा.पो.से**

पोलीस उप-आयुक्त, मुख्यालय

पिंपरी चिंचवड